**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.**
दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र. आरटीएस/अपील/०१/२०२५
दिनांक-२४.०२.२०२५

**प्रति,**

१. धोंडीराम गणपती खरात
रा. कुणीकोणूर, ता. जत, जि. सांगली **.... अपिलार्थी**

**विरूध्द**

१. शकुंतला गणपती खरात
२. मंडळ अधिकारी, वळसंग ता.जत जि.सांगली
अ.क्र.१ रा.जिरग्याळ, ता. जत, जि.सांगली **.... जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

**वाद मिळकतीचा तपशिल.**

| गांव | तालुका | गट नंबर | एकूण क्षेत्र | पैकी वादाचे क्षेत्र | वादाचा फेरफार |
|---|---|---|---|---|---|
| कुणीकोणूर | जत | ३२८ | ० हे. १६ आर, | संपूर्ण | २२८४ |
| | | ३३५ | ० हे. ५२ आर, | | |
| | | ३४६ | ० हे. ५१ आर, | | |

मौजे कुणीकोणूर, ता. जत, जि. सांगली येथील वरील वाद मिळकती संदर्भातील फेरफार नं. २२८४,प्रकरणी मंडळ अधिकारी, वळसंग, यांनी दिलेल्या आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे हक्कनोंद अपील दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपीलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली आहे.**

**अपिलार्थी यांनी आपले अपील अर्जामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. वाद मिळकत जाबदार नं. १ यांनी अपिलार्थीचे नावे करुन दिलेला बक्षीसपत्र दस्त क्र. १७४१/२०२४ दिनांक २७/३/२०२४ रोजीचा दस्त हा नोंद होऊन फेरफार मंजूर होणे कामी मंडळ अधिकारी वळसंग ता.जत जि. सांगली यांचेकडे दिला असता मंडळ अधिकारी वळसंग यांनी फे.नं. २२८४ हा फेरफार हा पीक पाहाणी मध्ये तफावत असा शेरा देऊन दिनांक २८/५/२०२४ रोजी रद्द केली आहे.

२. मंडळ अधिकारी यांनी महसूल कायद्यातील तरतुदीचे पालन न करता जो फे.नं. २२८४ रद्द चा आदेश केला आहे तो चुकीचा आहे. मंडळ अधिकारी यांनी कागदपत्रांचे अवलोकन न करता जो फे.नं.२२८४ ची नोंद रद्द चा आदेश केला आहे तो चुकीचा आहे सबब तो रद्द करणेत यावा. जाबदार यांनी अपिलार्थी करुन दिले बक्षीसपत्रास तुकडेबंदी तुकडेजोड कायद्याची बाधा येत नाही. याही बाबीकडे दुर्लक्ष करुन जो फे.नं. २२८४ ची नोंद रद्द केली आहे ती चुकीची आहे. मंडळ

अधिकारी यांनी महसूल कायद्यातील तरतुदीचे पायमल्ली करुन जो फे.नं.२२८४ ची नोंद रद्दबाबतचा आदेश केला आहे तो चुकीचा असून रद्दबातल होणेस पात्र आहे.

**जाबदार यांना प्रस्तुत अपिलकामी नोटीस बजाऊन म्हणणे मांडणेची संधी देणेत आलेली होती. त्यांनी सदर बक्षिसपत्राच्या नोंदीचा फेरफार क्र.२२८४ ची नोंद मंजूर करणेस त्यांची हरकत नाही असा युक्तिवाद सादर केलेला आहे.**

**अपिलार्थी यांनी प्रकरणी दाखल केलेला अपील मेमो,जाबदार यांचा युक्तिवाद व प्रकरणी दाखल उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रित अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे कुणीकोणूर, ता. जत येथील वाद मिळकतीच्या झालेल्या बक्षिसपात्राच्या व्यवहाराचे अनुषंगाने दप्तरी धरणेत असलेली फेरफार नोंद क्रमांक २२८४ ही " खरेदी दस्ताचा ७/१२ व संगणीकृत ७/१२ मध्ये पीकपाहणी मध्ये तफावत आहे, सबब नोंद रद्द नोंद नामंजूर " असा शेरा ठेवून मंडळ अधिकारी, वळसंग यांनी सदर नोंद रद्द केलेली दिसून येते.

२. वाद मिळकतीचा संपूर्ण हिस्सा हा जाबदार यांचेकडून अपिलार्थी यांनी नोंदणीकृत बक्षिसपत्राचा दस्त क्र.१७४१ दिनांक २७.०३.२०२४ रोजी खरेदी घेतलेली आहे. सदर बक्षिसपत्राची नोंद मंडळ अधिकारी वळसंग यांनी खरेदी दस्ताचे मधील ७/१२ व संगणीकृत ७/१२ वरील पीक पाहणी मध्ये तफावत आहे असा शेरा ठेवून नोंद रद्द केलेली दिसून येते. सदर नोंद रद्द करतांना नमूद कारण हे कायदेशीर नाही. त्यामुळे मंडळ अधिकारी वळसंग यांची वादातीत फेरफार रद्द करणेची कृती कायदेशीर ठरत नाही. त्यामुळेच अपिलार्थी यांना अपिल दाखल करणेस झालेला विलंब माफ करणेत येत आहे असे जाहीर करणेत येत आहे.

३. तसेच उक्त विवेचनाचाविचार करता, अपिलार्थी यांचे अपील मान्य करण्याशिवाय पर्याय शिल्लक राहत नाही. मंडळ अधिकारी, वळसंग यांनी अनावश्यकरीत्या फेरफार नोंद क्रमांक २२८४ रद्द केल्याचे दिसून येत आहे. सबब मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचे अपील मान्य करणेत येवून मौजे कुणीकोणूर ता.जत जि.सांगली येथील फेरफार नोंद क्रमांक २२८४ ची नोंद मंजूर करण्यात येत आहे. यापुढे असेही आदेश देणेत येत आहेत की, सदर नोंद रद्द करणेचे मंडळ अधिकारी वळसंग यांचे कारण पाहता सदर आदेशाचा अंमल तात्काळ करणेत यावा.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण -जत
दिनांक -२४.०२.२०२४

प्रत- तहसिलदार,जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.